# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.१ वार्ड क्र.४ मधील बाला कंम्पाऊंड मनपा शाळा क्र.८६ नुतनीकरण करणे. या कामी शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत तसेच सन २०२४-२५ चा मुळ अर्थसंकल्प तयार करतांना सन २०२४-२५ करीता रु.९.०० कोटी तरतूद करणेत आली होती. त्यात पुनविनियोजन करुन रु.१५९६.०० लक्ष तरतूद मधून रु.१.६० लक्ष शिल्लक आहेत. खालील काम हे रु.९९.९३ लक्ष रक्कमेचे असून महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत असून शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधून करणेत आले आहे. शासन हिस्सा ७५ टक्के (७४.९५) मनपा हिस्सा २५ टक्के (२४.९८ लक्ष) तरतूद इतकी प्रस्तावित आहे. त्यापैकी ठेकेदार यांचे अंतिम देयक. रु.७,५८,८९६/-इतक्या रक्कमेचे शिल्लक आहे. सदरची रक्कम टेकदार यांना देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा०. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **लेखाशिर्षकाचे नाव** | **सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात)** | **दि.२१/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात)** | **दि.२१/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. १५९६.०० लक्ष | रु. १५९४.४० लक्ष | रु.१.६० लक्ष | |
| | एकूण | रु. १५९६.०० लक्ष | रु. १५९४.४० लक्ष | रु.१.६० लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामध्ये शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधील निधी संपला आहे. खालील काम शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखा मधून प्रस्तावित असून रु.९९.९३ लक्ष इतक्या रक्कमेचे आहे. त्यापैकी शासननाचा ७५ टक्के व मनपाचा २५ टक्के हिस्सा असल्यामुळे व सदर देयकामधील मनपा हिस्सांमधील अंतीम देयक रु.७.५९ लक्ष रक्कमेचे देयक निधी अभावी ठेकेदार यांना अदा करणे बाकी आहे. ठेकेदार यांना सदरचे देयक अदा करणेकामी पुर्नविनियोजन करुन निधी उपलब्ध करुन देयक अदा करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सा०. यांनी दिनांक १४/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे या लेखाशिर्षामधून रु.७.६० लक्ष रक्कमेचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

विकास कामाचे नावे

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.१ वार्ड क्र.४ मधील बाला कंम्पाऊंड मनपा शाळा क्र.८६ नुतनीकरण करणे. | रु.७,५८,८९६/- | अंतिम धावते देयक |
| | एकूण | रु.७,५८,८९६/- | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. २१/०१/२०२५ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. २१/०१/२०२५ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे | १००.०० | ९०.०० | १०.०० | ७.६० |
| | एकूण | रु.१००.०० लक्ष | रु..९०.०० लक्ष | रु.१०.०० लक्ष | रु.७.६० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांच्याकडे निहीत आहेत.

भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.१ वार्ड क्र.४ मधील बाला कंम्पाऊंड मनपा शाळा क्र.८६ नुतनीकरण करणे. या कामाचे मनपा हिस्याची रक्कम रु.७,५८,८९६/- इतक्या रक्कमेचे अंतिम देयक ठेकेदार यांना अदा करावयाचे असल्यामुळे मुळ संचिकेसह कनिष्ठ अभियंता,प्रभाग समिती क्र.१ यांनी , पुर्नविनियोजन करणेकामी मुळ संचिकेसह प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर कामाकरीता मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांनी पुर्नविनियोजन करणेस दि.१४/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेले आहेत. त्या अनुषंगाने शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.८.६० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास दिनांक ३१/०१/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 038 दिनांक ४/ ०२/२०२५

भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.१ वार्ड क्र.४ मधील बाला कंम्पाऊंड मनपा शाळा क्र.८६ नुतनीकरण करणे. सदर काम रु.९९.९३ लक्ष रक्कमेचे असून शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधून करणेत आले आहे. त्यास शासन हिस्सा ७५ टक्के (७४.९५) मनपा हिस्सा २५ टक्के (२४.९८ लक्ष) तरतूद इतकी प्रस्तावित आहे. त्यापैकी ठेकेदार यांचे अंतिम देयक. रु.७,५८,८९६/-इतक्या रक्कमेचे शिल्लक आहे. सदरची रक्कम टेकदार यांना देणे गरजेचे आहे.

मात्र निधी अभावी प्रलंबित आहे. शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. सदर लेखाशिर्षामध्ये ८.६० लक्ष निधीचे पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे. तरी आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे या लेखाशिर्षामधून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.८.६० लक्ष रक्कमेचे पुर्नविनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च (रक्कम लाखात) | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ-९/२ आरक्षित जागांना कुंपन घालणेव भिंत बांधणे | सन २०२४-२५ करीता रु.१००.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.९०.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१०.०० लक्ष | महसुली खर्च भाग-२ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | सन २०२४-२५ करीता रु.१५९६.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१५९४.४० लक्ष | ७.६० लक्ष | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.७.६० लक्ष निधीचे सदर शिर्षामधुन पुर्नविनियोजनाने रककम वर्ग करणेत येत आहे. |
| | | एकूण | | | | | | | | ७.६० लक्ष | |

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा